दि.22/10/2026

प्रति,
मा. श्री. देवेंद्र फडणवीस साहेब,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई.

**विषय** : माहूर व किनवट तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याकडून शेतकऱ्यांना शेती कर्ज देण्यास टाळाटाळ, CIBIL Score व Written Off चे कारण देऊन कर्ज नाकारणे तसेच खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी मागणी करूनही रब्बी हंगामाच्या हिशोबाने कर्ज वाटप सुरू असल्याबाबत.

महोदय,

माहूर व किनवट तालुक्यात यावर्षी अत्यल्प पर्जन्यमानामुळे गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी शेती कर्जाची मागणी करूनही महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याकडून कर्ज वाटप करण्यास टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी आहेत.विशेष म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) कडून पात्र शेतकऱ्यांना शेती कर्ज उपलब्ध करून दिले जात असताना महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून कर्ज देण्यास टाळाटाळ होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.तसेच, काही शेतकऱ्यांना CIBIL Score कमी असल्याचे, पूर्वीचे कर्ज Written Off असल्याचे किंवा जुन्या कर्जाच्या नोंदी असल्याचे कारण देऊन शेती कर्ज नाकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत.खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी कर्जाची मागणी करूनही आता रब्बी हंगामाच्या हिशोबाने कर्ज वाटप सुरू असल्याने शेतकऱ्यांना वेळेत कर्जाचा लाभ मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही बाब गंभीर आहे.

**त्यामुळे शासनाने पुढीलप्रमाणे तातडीने कार्यवाही करावी** :

१) महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार येथील शेती कर्ज वाटप प्रक्रियेची चौकशी करण्यात यावी.

२) खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी कर्जाची मागणी केलेल्या पात्र शेतकऱ्यांचे अर्ज तातडीने निकाली काढून नियमानुसार कर्ज उपलब्ध करून द्यावे.

३) दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पात्र शेतकऱ्यांना केवळ CIBIL Score किंवा जुन्या कर्जाच्या Written Off नोंदींच्या आधारे सरसकट शेती कर्ज नाकारले जाऊ नये, याबाबत संबंधित बँकेला आवश्यक निर्देश द्यावेत.

४) माहूर व किनवट तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेती कर्ज मिळण्यासाठी विशेष कर्ज शिबिरांचे आयोजन करून प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करावा.

सदर प्रकरणाची मुख्यमंत्री स्तरावर तातडीने दखल घेऊन महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याबाबत चौकशीचे आदेश देऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

22/10/2026

हेमंत उत्तमराव गावंडे पाटील
रा. सायफळ, ता. माहूर, जि. नांदेड.

Scanned with OKEN Scanner

# Accounts:

| Account Number | Account Type | Member Short Name | Ownership Indicator | Opened Date | Last Payment Date | Date Reported | Sanctioned Amount | High Credit Amount | Current Balance | Amount Overdue | Credit Facility Status | Suit Filed Status |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | HousingLoan | NOT DISCLOSED | Individual | 31-12-2013 | -- | 31-08-2026 | | 150000 | 0 | | Written-off | |
| 8009866840 | GoldLoan | MGB | Individual | 8-10-2025 | -- | 31-08-2026 | | 200000 | 215727 | | | |
| 8009166092 | GoldLoan | MGB | Individual | 31-08-2024 | -- | 31-10-2025 | | 147000 | 0 | | | |
| 8008819995 | GoldLoan | MGB | Individual | 24-04-2024 | -- | 15-05-2025 | | 103500 | 0 | | | |
| | TwowheelerLoan | NOT DISCLOSED | Individual | 28-05-2014 | -- | 31-08-2026 | | 43000 | 0 | | | |
| | KisanCreditCard | NOT DISCLOSED | Individual | 16-10-2015 | 30-03-2019 | 31-03-2019 | | 150000 | 0 | | | |
| 8007815733 | KisanCreditCard | MGB | Individual | 16-11-2022 | 10-07-2024 | 31-08-2026 | | 110000 | 161697 | 161696 | | |
| | KisanCreditCard | NOT DISCLOSED | Individual | 6-05-2019 | 14-11-2022 | 30-11-2022 | | 81000 | 0 | | | |
| 8002626918 | BusinessLoanPrioritySectorAgricultureAcronymBLPSAGR | MGB | Individual | 11-08-2015 | 27-02-2022 | 15-05-2025 | | 55200 | 0 | | | |
| 8002627105 | BusinessLoanPrioritySectorAgricultureAcronymBLPSAGR | MGB | Individual | 11-08-2015 | 27-02-2022 | 15-05-2025 | | 25000 | 0 | | | |
| | BusinessLoanPrioritySectorAgricultureAcronymBLPSAGR | NOT DISCLOSED | Individual | 17-12-2014 | 12-10-2015 | 31-12-2016 | | 99000 | 0 | | | |
| | BusinessLoanPrioritySectorAgricultureAcronymBLPSAGR | NOT DISCLOSED | Individual | 24-09-2013 | 17-12-2014 | 31-12-2016 | | 30000 | 0 | | | |
| 8001057807 | BusinessLoanPrioritySectorAgricultureAcronymBLPSAGR | MGB | Individual | 30-08-2013 | 11-08-2015 | 15-05-2025 | | 50000 | 0 | | | |

प्रति,

मा. शाखा व्यवस्थापक साहेब,

महाराष्ट्र ग्रामीण बँक, वाई बाजार शाखा,

ता. माहूर, जि. नांदेड.

दिनांक : २१/१०/२०२६:

विषय : खरीप हंगामातील कापूस पिकाच्या क्षेत्रानुसार वाढीव शेती कर्ज मंजूर करण्याबाबत

महोदय,

सविनय विनंती अर्ज करतो की, मी वनमाला सुरेश गावंडे, राहणार सायफळ, ता. माहूर, जि. नांदेड येथील रहिवासी असून, मी आपल्या बँककडे दिनांक १२.०९.२०२६ रोजी खरीप हंगामासाठी नवीन शेती कर्ज मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जानुसार माझ्या कर्ज प्रकरणामध्ये सध्या रुपये ८८,५००/- अक्षरी रुपये अठ्ठ्याऐंशी हजार पाचशे फक्त इतक्या नवीन शेती कर्जाची नोंद करण्यात आलेली आहे. माझ्या नावे एकूण १ हेक्टर ३९ आर एवढे शेतजमिनीचे क्षेत्र असून, लवगडी खालील १ हेक्टर २६ आर एवढे क्षेत्र नमूद असल्याचे निदर्शनास आले आहे. मी खरीप हंगामामध्ये कापूस पिकाची लागवड केलेली असल्याने, माझ्या प्रत्यक्ष शेतजमिनीच्या क्षेत्राची व कापूस पिकाची नियमानुसार तपासणी करून, पात्र क्षेत्रानुसार मला मिळणाऱ्या शेती कर्जाची रक्कम पुनर्निश्चित करून वाढीव कर्ज मंजूर करण्यात यावे, ही नम्र विनंती.

तरी आपण माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून, कागदपत्रांची पडताळणी करावी व नियमानुसार मला वाढीव शेती कर्जाचा लाभ मंजूर करून द्यावा.

ही नम्र विनंती.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

स्वाक्षरी : वनमाला

अर्जदार : वनमाला सुरेश गावंडे

रा. सायफळ, ता. माहूर, जि. नांदेड.

Received

MAHARASHTRA GRAMIN BANK Wai Bazar Br. 4152

21/10/2026

दि. 19/10/2026

प्रति.

मा. शाखा व्यवस्थापक साहेब,
महाराष्ट्र ग्रामीण बँक, वाई (बा)
ता. माहुर जि. नांदेड

विषय :- दुष्काळी परिस्थीमुळे थकीत असलेले इतर बँकेचे गृहकर्ज परिस्थिती सुधारल्यानंतर भरण्यास तयार असुन, आपल्या बँकेकडुन नवीन शेती कर्ज मंजुर करण्या बाबत विनंती

महोदय

सविनय विनंती की मी लताबाई उत्तम गावंडे रा. सायफळ ता. माहुर जि. नांदेड येथील रहीवासी असुन, शेती माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रमुख व्यवसाय आहे

सध्या परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतीतुन अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने माझ्यावर इतर बँकेचे असलेले गृह कर्ज (होमलोन) थकीत आहे व शेतीतुन उत्पन्न मिळाल्यानंतर मी सदर थकीत कर्जाची परफेड करण्यास तयार आहे

दुष्काळी परिस्थीती लक्षात घेऊन आपल्या बँकेकडुन मला नवीन शेती कर्ज मंजुर करण्यात यावे, ही नम्र विनंती

अर्जदार
सौ. लताबाई उत्तम गा.

Gmail

Rajik Shaikh Executive editor <rajikshaikh2244@gmail.com>

## माहूर व किनवट तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याकडून शेतकऱ्यांना शेती कर्ज देण्यास टाळाटाळ, CIBIL Score व Written Off चे कारण देऊन कर्ज नाकारणे तसेच खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी मागणी करूनही रब्बी हंगामाच्या हिशोबाने कर्ज वाटप सुरू असल्याबाबत.

1 message

**Rajik Shaikh Executive editor** <rajikshaikh2244@gmail.com>
To: cm@maharashtra.gov.in

Thu, Oct 22, 2026 at 10:12 AM

**प्रति,**
**मा. श्री. देवेंद्र फडणवीस साहेब,**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,**
**मंत्रालय, मुंबई.**

**विषय :** माहूर व किनवट तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याकडून शेतकऱ्यांना शेती कर्ज देण्यास टाळाटाळ, CIBIL Score व Written Off चे कारण देऊन कर्ज नाकारणे तसेच खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी मागणी करूनही रब्बी हंगामाच्या हिशोबाने कर्ज वाटप सुरू असल्याबाबत.

**महोदय,**

माहूर व किनवट तालुक्यात यावर्षी अत्यल्प पर्जन्यमानामुळे गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी शेती कर्जाची मागणी करूनही महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याकडून कर्ज वाटप करण्यास टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी आहेत.विशेष म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) कडून पात्र शेतकऱ्यांना शेती कर्ज उपलब्ध करून दिले जात असताना महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून कर्ज देण्यास टाळाटाळ होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.तसेच, काही शेतकऱ्यांना CIBIL Score कमी असल्याचे, पूर्वीचे कर्ज Written Off असल्याचे किंवा जुन्या कर्जाच्या नोंदी असल्याचे कारण देऊन शेती कर्ज नाकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत.खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी कर्जाची मागणी करूनही आता रब्बी हंगामाच्या हिशोबाने कर्ज वाटप सुरू असल्याने शेतकऱ्यांना वेळेत कर्जाचा लाभ मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही बाब गंभीर आहे.

**त्यामुळे शासनाने पुढीलप्रमाणे तातडीने कार्यवाही करावी :**

१) महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार येथील शेती कर्ज वाटप प्रक्रियेची चौकशी करण्यात यावी.
२) खरीप हंगामाच्या मुदतीपूर्वी कर्जाची मागणी केलेल्या पात्र शेतकऱ्यांचे अर्ज तातडीने निकाली काढून नियमानुसार कर्ज उपलब्ध करून द्यावे.
३) दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पात्र शेतकऱ्यांना केवळ CIBIL Score किंवा जुन्या कर्जाच्या Written Off नोंदींच्या आधारे सरसकट शेती कर्ज नाकारले जाऊ नये, याबाबत संबंधित बँकेला आवश्यक निर्देश द्यावेत.
४) माहूर व किनवट तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शेती कर्ज मिळण्यासाठी विशेष कर्ज शिबिरांचे आयोजन करून प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करावा.

सदर प्रकरणाची मुख्यमंत्री स्तरावर तातडीने दखल घेऊन महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा वाई बाजार यांच्याबाबत चौकशीचे आदेश देऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, ही नम्र विनंती.

**आपला विश्वासू,**

हेमंत उत्तमराव गावंडे पाटील
रा. सायफळ, ता. माहूर, जि. नांदेड.
मो.८४५९८५६२७०.

**New Doc 10-22-2026 10.09.pdf**
339K



Scanned with OKEN Scanner